प्रेस नोट दि. २७/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातुर. |
| २. | पोलीस स्टेशन | जळकोट, .जि. लातुर |
| ३. | गुरन व कलम | गु.र.नं. ७३/२०२६, कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय २३वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. विरभद्र मंदिरजवळ, जळकोट ता. जळकोट, जि.लातूर |
| ५. | फिर्यादी :– सरकारतर्फे | संतोष धनसिंग बर्गे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि., लातूर |
| ६ | आरोपी लोकसेवक | अजय आनंद लद्दे, वय ३४ वर्ष, (खाजगी इसम) व्यवसाय–खाजगी नोकरी रा. जळकोट, तालुका जळकोट, जिल्हा लातूर |
| ७. | गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण | दि. २४/०३/२०२६ रोजी १२:२२ ते १३:२० वा. दरम्यान तहसील कार्यालय, जळकोट जि. लातूर |
| ९. | मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/– रू. |
| १०. | तडजोडीअती मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/– रू. |
| ११. | स्विकारलेली लाचेची रक्कम | – |
| १२ | **थोडक्यात हकिकत :–** यातील तक्रारदार यांचे विरूध्द जळकोट पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयावरून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असुन सदर केस तालुका दंडाधिकारी जळकोट यांच्याकडे सुरू आहे. तक्रारदार यांना सदर केसच्या पेशीकरीता वारंवार तहसील कार्यालय जळकोट जावे लागते.. दि १३/०३/२०२६ रोजी तक्रारदार हे तहसील कार्यालय जळकोट येथे तारखेस गेले असता तेथील कर्मचारी अजय आनंद लद्दे, वय ३४ वर्ष, यांनी तक्रारदार यांची तक्रारदार यांची प्रतिबंधक कारवाईची फाईल बंद करून पुढील तारखेस न येण्यासाठी २०००/–रू ची लाच मागणी केली आहे.अशी तक्रार दि. २४/०३/२०२६ रोजी प्राप्त झाली.<br>दिनांक २४/०३/२०२६ रोजी तहसील कार्यालय जळकोट ता.जळकोट येथे सापळा कार्यवाही आजमावली असता आरोपी खाजगी इसम अजय आनंद लद्दे, यांनी तक्रारदार यांची प्रतिबंधक कारवाईची फाईल बंद करण्यासाठी व पुढील तारखा न लावण्यासाठी स्वत:चा प्रभाव संबंधीत लोकसेवकावर पाडुन मदत करतो असे तक्रारदार यास सांगुन पंचासमक्ष २,०००/– रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,०००/– रुपये स्विकारण्यास सहमती दर्शविल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.<br>त्यावरून दि. २४/०३/२०२६ रोजी लाच स्विकृती सापळा आजमावला असता खाजगी इसम अजय आनंद लद्दे यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही त्यावरून आरोपी खाजगी इसम अजय आनंद लद्दे रा. जळकोट ता. जळकोट यांचे विरूध्द पोलीस स्टेशन जळकोट, जि.लातूर येथे गु.र.नं.७३/२०२६, कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास जगदीश राऊत, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. लातूर हे करीत आहेत. | |

सदर सापळा कार्यवाही मा. श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक जगदीश राऊत, पोह/दामटे, पोह/कठारे, पोह/शाम गिरी, पोह/भिमराव आलुरे, पोकॉ/मंगेश कोंडरे, पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/किरण गंभीरे, पोकॉ/गजानन जाधव, पोकॉ/शिवराज गायकवाड, पोका/असलम सय्यद, मपोकॉ/परविन तांबोळी, यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक :– ०२४६२–२५५८११ मोबाईल क्रमांक –९२२६४८४६९९
२) श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक :– ०२४६२–२५५८११
३) श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक :– मोबाईल क्रमांक –९२२६२०१०६४
४) टोल फ्री :– १०६४
५) ला.प्र.वि.,लातुर कार्यालय फोन क्रमांक :– ०२३८२–२४२६७४
६) Website :– www.acbmaharashtra.gov.in
७) Mobile App :– www.acbmaharashtra.net
८) Facebook Page :– www.facebook.com/maharashtraACB
९) 8 Twitter :– ACBlatur
१०) Instagram :– Acblatur
११) YouTube Channel :– anticurruptionbureaulatur1584

(संतोष ध.बर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर